# सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुंकळ्ळी – सासष्टी, गोवा.

# मराठी विभाग

# युवांकुर

अंक १, सप्टेंबर २०२२



## मराठी विभागाचे साहित्यिक मासिक.

## आपल्या हक्काचे व्यासपीठ.

अनुमोदक :
प्राचार्य डॉ. संजय सावंत देसाई

संपादिका :
सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर

सह-संपादिका :
सहायक प्रा. निखिता गांवकर

विद्यार्थीनी प्रतिनिधी: वैभवी फातर्पेकर

मुखपृष्ठ:
धन्यता देसाई
सौरव गोवेकर

# अनुक्रमणिका

❖ **संपादकीय** / पृ. ३

❖ **निबंध वाङ्मय**

१. समाजमाध्यमे – फायदे व तोटे / रेखा मायनाथ / पृ. ५

२. वाचन संस्कृती / ईशा देसाई / पृ. ७

३. असा धरी छंद / सरोजा गांवकर / पृ. ९

❖ **कविता**

१. हरवला का तो निसर्ग? / अनामिका सावंत / पृ. ११.

२. मीच मला अनोळखी / श्रद्धा महाले / पृ. १२

३. आत्मशोध / धन्यता देसाई / पृ. १३

४. धर्म / सिद्धू लांबोर / पृ. १४

❖ **थोडं व्याकरण शिकुया**

१. शुद्धलेखन / वैभवी फातर्पेकर / पृ. १६

२. वाक्प्रचार / वैभवी फातर्पेकर / पृ. १७

**।। शब्दची आमुच्या जीवाचे जीवन**
**शब्दे वाटू धन जनलोका ।।**

-संत तुकाराम

# संपादकांच्या खिडकीतून डोकावताना..

प्रिय वाचकहो..

मराठी विभागाच्या 'युवांकुर' e-मासिकाचा पहिला-वहिला अंक आपल्यासमोर ठेवताना मला अत्यानंद होत आहे. या अंकात विद्यार्थ्यांच्या सर्जनशक्तीचे प्रतिबिंब निबंध, कविता, परीक्षण अशा साहित्यप्रकारांच्या माध्यमातून उमटलेले आहे.

महाविद्यालयीन जीवन हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक निर्णायक टप्पा मानला जातो. ह्या ज्ञानमंदिराच्या आवारातच ह्या विद्यार्थीरूपी अंकुराच्या वृक्ष बनण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होते. अशा ह्या निर्णायक क्षणी वाचन व लेखनच विद्यार्थ्यांना यशाचे शिखर गाठण्यासाठी मदत करतात. ह्या पुण्यकर्मासाठी मराठी विभाग आपल्यापरीने हा खारीचा वाटा उचलत आहे.

ह्या साहित्यिक मासिकाद्वारे विद्यार्थ्यांना त्यांचे हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न राहील. इथे त्यांच्या विचारांना व अभिव्यक्तीला चालना मिळवून दिली जाईल. तसेच, त्यांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी त्यांना एक मुक्त व्यासपीठ लाभेल.

ह्या युवांकुरांची ज्ञानरूपी वृक्षात वाढ होवो हीच प्रार्थना !

संपादिका:
सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर
shubhlaxminaikgaonkar@cescollege.ac.in

सह-संपादिका:
सहायक प्रा. निखिता गांवकर
nikhitagaonkar@cescollege.ac.in



# निबंध

# सामाजिक माध्यमे - फायदे आणि तोटे

- रेखा मायनाथ (प्रथम वर्ष कला)

आज आजच्या काळात सामाजिक माध्यमे माणसांच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग बनलेली आहेत. त्यांच्याशिवाय आजची युवापिढी जगूच शकत नाही. पूर्वीच्या काळी लोकं सामाजिक माध्यमांचा वापर करत नव्हती त्यामुळे ते आपला वेळ चांगल्या पद्धतीने घालवत असत. व्हॉट्सअॅप, युट्यूब, इंस्टाग्राम इ. ही सर्व सामाजिक माध्यमांची उदाहरणे आहेत.

सामाजिक माध्यमे आजच्या युगात खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. कमी वेळेत माहिती गोळा करणे, जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणे, जगभरातील लोकांना आपली ओळख करून देणे ही सर्व कामे सामाजिक माध्यमे करत असतात. यांच्याशिवाय इतर अनेक गोष्टीसाठी आपण त्यांचा उपयोग करू शकतो. सामाजिक माध्यमे हा एक असा प्लॅटफॉर्म आहे जिथे आपण आपल्या ओळखीच्या आणि अनोळखी व्यक्तींशी देखील जोडलेले असतो. ह्या माध्यमातून त्यांच्याशी आपली मैत्री होते.

आजकाल शिक्षण सुध्दा त्याच्यावरच अवलंबून आहे. याचा वापर शैक्षणिक आणि व्यावसायिक कामासाठी देखील करता येतो. मोठे - मोठे व्यावसायिक सुद्धा सामाजिक माध्यमाद्वारे आपले व्यवसाय जगभरात वाढवित आहेत. सामाजिक माध्यमांच्या आधारे आपण एका जागेवर बसून जगातील कोणत्याही कोपऱ्यात पोहोचू शकतो. त्याचा वापर करण्यासाठी आपल्याला जागा किंवा वेळ पाहण्याची गरज भासत नाही. थोडक्यात सांगायचं म्हणजे आजचं जीवन सामाजिक माध्यमावरच अवलंबून आहे. ते आपल्या जगण्याचा भाग बनलेले आहे.

सामाजिक माध्यमातून काही मिनिटांपूर्वी घडलेली घटना ही संपूर्ण जगभरात लगेच पोहोचू शकते. आपले मित्र किंवा नातेवाईक परदेशात राहत असतील तर पूर्वी त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी मोबाईलवरून कॉल करणे हा सोपा मार्ग होता परंतु यात आपले भरपूर पैसे जायचे, पण आता इंटरनेट कॉलिंगद्वारे गोष्टी अजून सोप्या बनलेल्या आहेत. आपण सामाजिक माध्यमातून आपल्या पासून दूर असलेल्या लोकांशी सहज संपर्क करू शकतो.

ज्याप्रमाणे नाण्याच्या दोन बाजू असतात, त्याचप्रमाणे सामाजिक माध्यमांच्या देखील दोन बाजू आहेत. आपण याचा उपयोग तर करतो पण याचे व्यसन आपल्याला कधी कसे लागेल याचे आपल्यालाही कळणार नाही. सामाजिक माध्यमांद्वारे कोणीही कोणाला फसवू शकतो. आपण बऱ्याचदा ऐकले असेल की सामाजिक माध्यमे हॅक सुद्धा करता येतात. तुमची माहिती तुमच्यापाशी गुप्त असायला हवी. तुमचा अकाउंट (account) हॅक करून कोणीही तुम्हाला फसवू शकतो. अनेक

फेक अकाउंट सुद्धा असतात आणि सामान्य नागरिक, ज्यांना ह्यातले जास्त काही समजत नाही असे लोक या गोष्टीला बळी पडतात.

लहान - लहान मुलांच्या हातात मोबाईल आले आहेत आणि ते या सामाजिक माध्यमांवर गरजेपेक्षा जास्त वेळ घालवतात. याचा वाईट परिणाम त्यांच्यावर झालेला आहे. त्यांना सामाजिक माध्यमे म्हणजे विश्वच आहे असे वाटायला लागलेले आहे. निसर्गाविषयी, प्राण्याबद्दल प्रेम या सर्व गोष्टींपासून ते खूप दूर निघून गेलेले आहेत. मुलांमधील खेळण्याची, वाचन-लेखन करण्याची सवय मोडलेली आहे. आजची युवापिढी प्रगतीच्या मार्गावर जाण्याऐवजी अधोगतीच्या मार्गावर जात आहे.

सामाजिक माध्यमांचे व्यसन सगळ्यांनाच लागलेले आहे. त्यांची सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजू आहेत. पण पाहिला गेले तर, सामाजिक माध्यमांचा फायद्यापेक्षा जास्त तोटा आहे. पण हे आपल्यावरच अवलंबून असते की आपण त्याचे फायदे करून घ्यायचे की तोटे. आपणच अशा माध्यमांचा वापर करताना काळजी घेतली पाहिजे.



# वाचन संस्कृती

- ईशा देसाई (द्वितीय वर्ष कला)

सुसंस्कृत, सुशिक्षित समाजात साहित्य, संगीत, ललितकला आणि वैचारिक व वैज्ञानिक शास्त्र या विषयी विचार करून इतरांना विचार करायला लावणारी संस्कृती म्हणजे वाचन संस्कृती.

वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी वाचनाची आवड निर्माण होणे आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा "वाचाल तर वाचाल" हा अमूल्य विचार आपल्या सर्वांसाठीच अतिशय मोलाचा आहे. ज्ञान आणि वाचन यांचे अगदी घनिष्ट संबंध आहेत. जर ज्ञान मिळवायचे असेल तर आपल्याला वाचन करणे गरजेचे आहे.

आपण आपल्या दैनंदिन जीवनात काही ना काही वाचत असतो. आपण जे वाचतो ते लक्षात ठेवून रोजच्या जीवनात ते ज्ञान वापरणे फार गरजेचे आहे. ह्या ज्ञानाच्याच साहाय्याने आपण आपल्या आयुष्यातील चढउतारांना सामोरे जाऊ शकतो.

आजच्या आम्हा तरूण पिढीला वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून देणे हे फार गरजेचे आहे कारण आम्ही तरुण मुले केवळ मोबाईलवर विश्व शोधण्याचा प्रयत्न करत आहोत. सारासर पाहता दहा मुलांमध्ये केवळ एका मुलाच्या हाती आपल्याला पुस्तक सापडेल. तरूण पिढीला वाचन करण्याचा अतिशय कंटाळा येतो. मात्र एक गोष्ट आपल्या धन्यात येत नाही कि फोन, संगणक व इतर ई-माध्यमे आपल्या कल्पनाशक्तीला सुरुंग लावतात.

जुन्या काळात आजच्या तुलनेत शाळा व तत्सम शिक्षण संस्था दुर्मिळ होत्या. त्यामुळे वाचन संस्कृती रुजवणे अतिशय कठीण होते. आज मात्र गावोगावी शाळा आहेत. मात्र तरीही आज वाचन संस्कृती रुजलेली आहे असे आपण म्हणू शकत नाही. याचे कारण आपल्या शिक्षण व्यवस्थेत आपल्याला सापडू शकते. अभ्यास करणे म्हणजे घोकमपट्टी करणे असेच बहुतेक लोकांना वाटतं. ज्यामुळे आपण वाचन, मनन व चिंतन ह्या सूत्रापासून वंचित राहतो.

आजकालच्या धकाधकीच्या जीवन पद्धती मुळे किंवा पाश्चात्य संस्कृती मुळे वाचन संस्कृती मागे पडू लागली आहे. लहान मुले काय, प्रौढ लोकंही फार कमी वाचन करताना दिसतात. मोबाइलरूपी सापाने सर्वांना वेढून टाकलेले आहे. ह्यातून वाचनासाठी वेळ काढणे कठीण बनते. ह्यावर एक रामबाण उपाय म्हणजे शिस्त. आपण स्वतःलाच लावून घेतलेली शिस्तच आपल्याला

दररोज वाचन करायला भाग पाडू शकते. रोजचा एक तास तरी आपण वाचनात घालवू हा नियम आपण स्वतःलाच लावून घेतला पाहिजे.

वाचन संस्कृतीची नाळ प्रत्येक माणसाशी प्राचीन काळापासून जोडली गेली आहे. "वाचनाचा लळा, फुलवी जीवनाचा मळा" हे वचन अगदी बरोबर आहे. कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी ग्रथांचे व वाचनाचे महत्त्व अतिशय सुंदर शब्दांत वर्णीलेले आहे ते म्हणतात, “या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती, ग्रंथ शिकवीत माणुसकी अन् ग्रंथ शिकविती शांती.” खरंच, ग्रंथच माणसाला क्रांतीशील पण तितकेच नम्र बनवतात. हे सगळे केवळ वाचनामुळे शक्य आहे.

चला तर आपण एक पाऊल पुढे टाकूया, पुस्तकांशी मैत्री करूया आणि वाचन संस्कृतीचे जतन करूया.



# असा धरी छंद

- सरोजा गांवकर (द्वितीय वर्ष कला)

संत तुकाराम महाराज म्हणतात, " असाध्य ते साध्य करता सायास I कारण अभ्यास तुका म्हणेI" म्हणजेच, कोणतीही गोष्ट साध्य करायची असल्यास प्रयत्न करत राहणे गरजेचे आहे. आपले ज्ञान वाढवत राहिल्यानेच आपण असाध्य वाटणाऱ्या गोष्टिही साध्य करू शकतो. ज्ञान मिळवण्याचा सगळ्यात उत्तम मार्ग व एक उत्तम छंद म्हणजे वाचन.

लहानपणापासूनच पुस्तकांशी आपली गट्टी जमली पाहिजे. कारण पुस्तके ही अशी गोष्ट आहे जी जीवनभर आपली साथ देऊ शकतात. बालपणातील रामायण महाभारतातील कथा, साने गुरुजींची संस्कारांची शिदोरी श्यामची आई, पंचतंत्र यातील कथा कळतनकळतपणे बालमनावर तर संस्कार करतातच. मात्र मोठेपणीही वाचनातून मिळालेली ही संस्कारांची शिदोरी आपल्याला एक माणूस म्हणून घडवत असते. ही वाचन संस्कृती आपणच जोपासली पाहिजे.

वाचनाचे सूत्र गवसल्याने माणसाच्या जीवनाचे सार्थक होते. वाचन माणसाला ज्ञानी व तितकेच नम्र बनवते. ज्यामुळे आपल्या जीवनाचे ध्येय गाठणे सहज शक्य होते. वाचनामुळे आपण चारही अंगांनी, वेगवेगळ्या पद्धतीने विचार करू शकतो. जर आपण दररोज वर्तमानपत्रे वाचलीत तर त्यातूनही आपल्याला जगातील विविध घडामोडी समजू शकतात. तसेच, आपले उच्चारही स्पष्ट होतात.

प्रत्येकाने वाचन हा छंद जोपासला पाहिजे. वेगवेगळे साहित्यप्रकार जसे की, कथा, कादंबरी, नाटक, कविता, निबंध इत्यादी वाचले पाहिजेत. एका क्लिकने 'सर्च' करणाऱ्या पिढीला आज वाचनाचा प्रचंड कंटाळा येतो. मात्र या स्पर्धात्मक जगात क्लिकने मिळवलेली माहिती टिकत नाही. तर पुस्तके वाचून मिळवलेल्या ज्ञानाचाच आपल्याला अधिक फायदा होतो. या स्पर्धात्मक जगात जर आपल्याला टिकायचे असेल तर वाचनाला पर्याय नाही. जर आपण ज्ञानात वेळेवर भर घातली नाही तर आपण मागेच राहू.

सर्वात मोठी शक्ती म्हणजे ज्ञान होय या शक्तीमुळेच आपण हुशार व सुसंस्कृत बनतो. संत तुकाराम म्हणतात, 'शब्दचिच आमुच्या जीवाचे जीवन, शब्दे वाटू धन जनलोका'. याच शब्दांचे जतन करूया, वाचनाने समृद्ध बनूया.



# कविता

# हरवला का तो निसर्ग ???

- अनामिका सावंत (प्रथम वर्ष कला)



हरवला का तो निसर्ग ?
जो आपण लहानपणी पाहिला
जिकडे तिकडे हिरवी झाडे
आणि पक्ष्यांचा किलबिलाट.

कुठे गेले ते पक्षी
जे लहानपणी आपल्याला दिसायचे
दुर कुठे असायचे
मधुर किलबिलाट करायचे.

पहिल्या पावसाचा तो गार वारा
दाटलेले ते ते काळे नभ
सरसर येते ती पाऊस धारा
सगळ्यांसाठी
च आनंद निराळा.

पहिल्या पावसातला मातीचा सुवास
अजूनही आवडतो का कुणाला?
हरवला का तो निसर्ग
जो आपण लहानपणी पाहिला.

रंगीबेरंगी फुलांचा दरवळलेला तो गंध
आवडतात का अजूनही मळायला
गजरे केसात ?

जग सारे बदलत गेले
विसरून ह्या निसर्गाला
हरवला का तो निसर्ग
जो आपण लहानपणी अनुभवला ?

# मीच मला अनोळखी.

- श्रद्धा महाले (तृतीय वर्ष कला)

माझे मलाच माहीत नाही,

मी कुठे जाते

जिथे मी पोहोचते

तिथे मीच मला ओळखत नाही

मी काय लिहिते ते मलाच कळेना

माझ्या शब्दांचा अर्थ

मलाच उमजेना

सगळेच मुखवट्यांमागचे

अनोळखी चेहरे

ह्या गर्दीत मुखवट्यांच्या

मी माझाच शोध घेते

माझ्या जीवनाचा अर्थ

चाचपडत शोधते

मी ही वेडी

असंख्य स्वप्ने रंगवते

माझे मन

ह्याच स्वप्नांच्या


दुनियेत रमते.



# आत्मशोध

- धन्यता देसाई (द्वितीय वर्ष कला)

कधी कधी वाटतं
एकटच जाऊन
बसावं समुद्रकिनारी..
नसावी अनोळखी सावली
फक्त ह्या लाटा,
मी आणि एकांत.



वाटतं, बघत बसावं
हा खेळ लाटांचा
त्यातच शोधावा
किनारा जीवनाचा
हरवलेल्या स्वतःला
थोडं शोधून पहावं.

लाटांमध्ये हरवलेल्या
सूर्याला पाहिल्यावर वाटतं
जगावं तर, असं जगावं
मावळत्या सूर्याला बघण्यासाठी जगावं
दुखांना साऱ्या बाजूला ठेवून
आनंद घ्यावा ह्या क्षणाचा.

जीवनाचा सूर्योदय बघताना
आशेचे किरण होऊन जावे
सोनेरी किरणांनी
जीवनाचा रस्ता तयार करावा.

# धर्म

सिद्धू लांबोर (तृतीय वर्ष कला)

विंचू चावतो

कारण तोच

धर्म त्याचा.

साधू चावून घेतो

कारण तो धर्म साधूचा

कोण चुकतोय?

कोण दुःखवून घेतोय?

कोणाच्या पापाचे

कोण फळ भोगतोय !



# थोडं व्याकरण शिकुया.

- वैभवी फातर्पेकर (तृतीय वर्ष कला)

# शुद्धलेखन

दैनंदिन जीवनात आपण अनेक शब्द चुकीचे लिहितो व त्यांचा उच्चारही चुकीच्या पद्धतीने करत असतो. यासाठी आपण शुद्धलेखन जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे.

| अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|
| गूज | गुज |
| आधीन | अधीन |
| ऊर्फ | उर्फ |
| ऋषिकेश | हृषिकेश |
| खिजगणती | किसगणती |
| दुःखी कष्टी | दूःखिकष्टी |
| देवून | देऊन |
| येऊद्या | येऊ द्या |
| परिक्षक | परीक्षक |
| हृषी | ऋषी |
| मिटर | मीटर |
| चिटकलेला | चिकटलेला |

**संदर्भ ग्रंथः**


- वाळंबे, मो .रा.(२००७): सुगम मराठी व्याकरण-लेखन, पुणे, नितीन प्रकाशन.
- फडके, अरुण (२०२२): शुद्धलेखन ठेवा खिशात, पुणे, राजहंस प्रकाशन प्रा. लि.

# वाक्प्रचार

मराठी व्याकरणाचे अभ्यासक कै. मो .रा. वाळंबे यांच्या मते "शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला वाक्प्रचार असे म्हणतात." म्हणजेच, दैनंदिन बोलण्यात आपण असे कितीतरी शब्द वापरतो ज्यांच्या शब्दशः अर्थापेक्षा रूढ झालेला अर्थ जास्त लोकप्रिय होतो यांनाच आपण वाक्प्रचार असे म्हणू शकतो. वाक्प्रचारांच्या वापराने आपल्या भाषेतील शब्द संपत्ती वाढते. चला तर काही वाक्प्रचार पाहूया.

१. **वाक्प्रचार** - अंग मोडून काम करणे- **अर्थ** - खूप कष्ट करणे.

**वाक्य:** अंग मोडून काम करून तिने परीक्षेत चांगले गुण मिळवले.

२. कटू सत्य - ऐकायला कठीण पण वस्तुस्थितीत खरे असणे.

**वाक्य:** आपली माणसे आपल्यालाच ओळखू शकत नाहीत हे एक कटू सत्य आहे.

३. कर्म कथा सांगत बसणे- स्वतःच्या आयुष्यातील दुःखद घटना सांगणे.

**वाक्य:** त्याने आपल्या आयुष्याची कर्म कथा सांगून लोकांना भावुक केले.

४. काकुळीतीस येणे – गयावया करणे- काकुळता म्हणजे याचना, म्हणजे एखाद्याने स्वतःला कमी लेखून विनंती करणे.

**वाक्य:** गरीब बिचारा भिकारी भुकेमुळे काकुळतीला आला.

५. कळसुत्री बाहुली- दुसऱ्यांच्या तालावर नाचणे, कळसुत्री बाहुलीचा खेळ करणारा जशी सूत्रे हलवतो.

**वाक्य:** कर्मचारी वर्ग मालकाच्या हातातली कळसुत्री बाहुली  बनतो.

६. खाऊ की गिळू करून सोडणे - एखाद्याला खूप छळणे.

**वाक्य:** पोलिसांनी चोराला खाऊ की गिळू करून सोडले.

७. खारीचा वाटा उचलणे- आपल्याकडून दुसऱ्याला थोडेसे साहाय्य करणे.

**वाक्य:** माझ्या मित्राला पैशांची मदत हवी असल्याने आम्हीही थोडा खारीचा वाटा उचलला.

८. खुंटीस अडकणे- एखादे काम अपूर्ण ठेवणे /अडकवून रहाणे.

**वाक्य:** त्याने आपली लेखनाची आवड खुंटीवर अडकवून टाकली.

९. गनिमी कावा-नकळत चकवणे.

**वाक्य:** काही मित्र गनिमी कावा करून घात घेतात.

१०. हवेत मनोरे उभारणे – स्वप्ने रंगवणे.

**वाक्य:** सहलीचे ठिकाण कळतानाच आम्ही मुले हवेत मनोरे उभारू लागलो.

**संदर्भ ग्रंथ:**


- वाळंबे,मो.रा.(२००७): सुगम मराठी व्याकरण-लेखन, पुणे, नितीन प्रकाशन.
- डॉ. जोशी अरुण(२०२२): म्हणी आणि वाक्प्रचार, पुणे, राजहंस प्रकाशन प्रा.लि.